# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर
**५३९, राजेंद्रनगर, कोल्हापूर-४१६ ००४.**

दुरध्वनी क्र-०२३१-२६९६१०१/२/३Website-www.sscboardkolhapur.inEmail Id- divsec.kop@gmail.com


क्रं /कोविमं/उ.मा./गोप/3514
कोल्हापूर - ४१६ ००४
दिनांक :- ०१/०३/२०२४

प्रति,
प्राचार्य/ मुख्याध्यापक ,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा, सांगली व कोल्हापूर

**विषय - माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी - मार्च २०२४ उत्तरपत्रिका तपासणीवर बहिष्काराबाबत .**

**संदर्भ - १) महाराष्ट्र राज्य (कायम) विना अनुदानित शाळा कृती समिती, कोल्हापूर यांचे पत्र क्रमांक १२२/२०२४, दिनांक :०१/०३/२०२४**

**२) शिक्षक समन्वय संघ महाराष्ट्र राज्य यांचे पत्र दिनांक : २९/०२/२०२४**

उपरोक्त संदर्भांकित विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य (कायम) विना अनुदानित शाळा कृती समिती, कोल्हापूर व शिक्षक समन्वय संघ महाराष्ट्र राज्य,यांची शासनाने मागण्यांची पूर्तता केली नसल्यामुळे अंशत: अनुदानीत (२०% ,४०%,६०%) शिक्षकांनी इ.१०वी व इ.१२वी च्या उत्तरपत्रिका तपासणीवर बहिष्कार टाकलेला आहे, असे निवेदन प्राप्त झाले आहे.

सध्यास्थितीत इ.१२वी व इ. १० वी परीक्षांच्या उत्तरपत्रिका परिरक्षक कार्यालयातुन संबंधित परीक्षक यांचे शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाकडे पाठविण्याची कार्यवाही सुरु आहे. तरी आपल्या कनिष्ठ महाविद्यालयामधील / शाळेतील शिक्षक बहिष्कारामध्ये सहभागी असतील तर अशा शिक्षकांचे उत्तरपत्रिकांचे गठ्ठे प्राप्त करून घेउन प्राचार्य/ मुख्याध्यापक यांनी आपल्या कपाटामध्ये सुरक्षित ठेवावे, कोणत्याही परिस्थितीत गठ्ठे मंडळ कार्यालयाकडे परत पाठवू नयेत. उत्तरपत्रिका तपासणीवरील बहिष्कार मिटल्यानंतर सदरच्या उत्तरपत्रिका संबंधित परीक्षकाकडून तपासून घेवून नियामकाकडे सुपुर्त करण्याची कार्यवाही करावी.

(सुभाष रा. चौगुले)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.